# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईंट मार्ग, नागपुर–४४० ०३३
Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. रातुमनावि/म.वि.वि./ 6067 दिनांक २८.११.२०२३

**प्रति,**

**प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,**
**सर्व संलग्नित महाविद्यालय,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

**विषयः–** सत्र २०२४–२५ साठी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचे शैक्षणिक व प्रशासकिय लेखा परिक्षण करण्याबाबत.

**महोदय/महोदया,**

आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे शैक्षणिक व प्रशासकिय लेखा परिक्षण करण्याकरिता विद्यापीठाद्वारे दिनांक ०७.११.२०२३ रोजी निर्देश क्र. ४६/२०२३ निर्गमित केलेला आहे. त्याची प्रत **onlinedcudrtmnu.org** या वेब पोर्टलवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. निर्देशातील तरतुदीनुसार सत्र २०२४–२५ करिता सर्व महाविद्यालयांना शैक्षणिक व प्रशासकिय लेखा परिक्षण करण्याकरिता **दिनांक ०१.१२.२०२३ पासून दि. ३१.१२.२०२३ पर्यंत** ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरून अर्ज करणे आवश्यक आहे. **ज्या महाविद्यालयांना सत्र २०२४–२५ व २०२५–२६ पर्यंत संलग्निकरण असेल अशा महाविद्यालयांना/अभ्यासक्रमांना सुद्धा शैक्षणिक व प्रशासकिय लेखा परिक्षणाकरिता निर्देशातील तरतुदीनुसार ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरून अर्ज सादर करणे अनिवार्य राहील.**

त्याचप्रमाणे ज्या महाविद्यालयांना विद्यापीठाचे **कायम संलग्निकरण** आहे. अशा महाविद्यालयांना देखील निर्देशातील तरतुदीनुसार वार्षीक शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरून अर्ज सादर करणे अनिवार्य राहील.

**जी महाविद्यालये उपरोक्त मुदतीत सत्र २०२४–२५ करिता अर्ज सादर करणार नाही त्या महाविद्यालयांना निर्देशातील तरतुदीनुसार नुसार विलंब शुल्क भरून अर्ज सादर करावे लागतील कृपया याची नोंद घ्यावी.**

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, शैक्षणिक व प्रशासकिय लेखा परिक्षणाकरिता निर्गमीत करण्यात आलेल्या निर्देश क्र.४६/२०२३ चे सुक्ष्मरित्या अवलोकन करून योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती.

**टिपः–ऑनलाईन शुल्क भरण्यापुर्वी महाविद्यालयांनी आपले महाविद्यालयात सुरू असलेल्या अभ्यासक्रमांची नोंद शुल्क भरण्यात येणा–या यादीत झाली आहे याची खातरजमा केल्यानंतरच शुल्क भरण्याबाबतची कार्यवाही घ्यावी. तसेच अभ्यासक्रम/विषय/तुकडया यात काही बदल असल्यास महाविद्यालय विकास विभागातील संबंधित अधिका–यांशी संपर्क साधून दुरूस्ती करून घ्यावी.**

आपला

डॉ. रमण मदने
उपकुलसचिव

प्रतिलीपीः–

१. मा. वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर